# १. क्षेत्रभेट

**सारांश :**

एखादया ठिकाणास प्रत्यक्ष भेट देऊन तेथील भौगोलिक व सांस्कृतिक घटकांची माहिती मिळवणे म्हणजे क्षेत्रभेट होय.

क्षेत्रभेटीव्दारे एखाद्या क्षेत्राच्या भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक बाबींशी संबंधित माहिती मिळवता येते. तसेच आपल्याला भौगोलिक संकल्पनांचा, घटकांचा तसेच प्रकियांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येतो. मानव व पर्यावरण यातील सहसंबंध जाणून घेता येतो. क्षेत्रभेटीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करता येतो. भूगोलाचा अभ्यास रंजक होतो. तसेच अभ्यासलेल्या ज्ञानाच्या उपयोजनास चालना मिळते.

क्षेत्रभेटीदरम्यान स्वतःची व इतरांच्या सुरक्षितेची काळजी घेणे महत्त्वाचे असते. तसेच क्षेत्रभेटीच्या क्षेत्रातील मालमत्तेचे व पर्यावरणाचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. क्षेत्रभेटीसाठी लागणारे साहित्य जसे पेन, पेन्सील, कॅमेरा, दुर्बीण, नोंदवही, प्रथमोचारपेटी, होकायंत्र, पाण्याची बाटली, पिशवी, नकाशे, नमुना प्रश्नावली इ. सोबत असावे.

क्षेत्रभेट झाल्यावर 1) प्रस्तावना 2) क्षेत्रभेटीचे महत्त्व व उद्दिष्टे 3) संबंधित क्षेत्रातील प्राकृतिक रचना, हवामान, पर्जन्यमान, उद्योग, पिके, वनस्पती, नद्या, घराची रचना, वाहतुकीच्यासोयी, लोकसंख्या, लोकांचा आहार, पोशाख, संस्कृती इ. च्या माहितीचे तक्ते, आलेख, नकाशे इ च्या साहाय्याने सादरीकरण 4) निष्कर्ष यांच्या साहाय्याने अहवाल लिहावा.